नि. दि. दावा क्र. १८/२०१८
देवराम व इतर वि. मीना व इतर

## नि. क्र. ५ खालील आदेश

वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश– ३९, नियम– १ व २ अन्वये प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जातील संक्षिप्त कथन असे की, मौजा घाटी/पळसगांव, ता. अर्जुनी/मोरगांव येथील गट क्र. १३८/१ आराजी ०.६१ हे. आर. ही शेतजमीन वादी क्र. १ व त्यांचे मयत वडील दशरथ यांनी संयुक्तरीत्या खरेदी केली असून त्यावर सध्या ओमप्रकाश व वादी क्र. २ च्या नावाची नोंद सात बारा उताराला आहे. सदर गटाचे हिस्सेवाटणी झालेली नाही. (यापुढे उपरोक्त शेतजमिनीस संक्षेपाकरिता 'दाव्यातील शेतजमीन' असे संबोधण्यात येते.) दाव्यातील शेतजमीन विकत घेतल्यापासून वादी क. १ हा ती जमीन कसत होता. सन २०१६ मध्ये ओमप्रकाश हा मयत झाल्यानंतर त्यांच्या दोन्ही मुलीचे पालनपोषण वादी क्र. १ करीत असून वादी क्र. १ ची आई वादी क्र. ३ हिचे पालनपोषणसुद्धा वादी क्र. १ करतो. सन २०१८ पर्यंत कुणीही दाव्यातील शेतजमिनीवरील वादी क्र. १ च्या ताब्यास अडथळा केला नाही. दिनांक २६/०९/२०१६ रोजी ओमप्रकाश यांची हत्या होवून त्या प्रकरणात प्रतिवादी क्र. ५ हीसुद्धा मुख्य आरोपी असून प्रकरण जिल्हा न्यायालयात प्रलंबित आहे. त्याच दिवशापासून प्रतिवादी क्र. ५ ही आपल्या माहेरी मौजा अड्याळ, ता. पवनी, जि. भंडारा येथे राहत आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ हे जय अम्बे महिला गटाचे पदाधिकारी असून प्रतिवादी क्र. ४ हा टॅक्टर डायव्हर आहे. प्रतिवादी क्र. ५ हिने प्रतिवादी क्र. १ ते

३ यांच्या गटाकडून घेतलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी दाव्यातील शेतजमिनीवरील वादीच्या शांततामय ताब्यास अडथळा करण्याचा प्रयत्न प्रतिवादी क्र. १ ते ३ करीत आहेत. वस्तुत: सदरचे कर्ज हे मुदतबाहय आहे. दिनांक १४/०६/२०१८ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादींच्या घराजवळ येवून कर्जाची रक्कम परतफेड न केल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. दिनांक १५/०६/२०१८ रोजी सकाळी ९.३० वाजता दाव्यातील शेतजमिनीवर येवून प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी नांगरण्यास सुरूवात केली. त्याच दिवशी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी पाठवलेले नोटीस वादीस प्राप्त झाले. त्यादिवशी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादींना शिवीगाळ केली. त्याबाबत वादींनी पोलीस ठाणे, अर्जुनी/मोरगांव येथे रिपोर्ट दिली. वादी क्र. १ याने दिनांक १८/०९/२०१८ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ३ च्या नोटीसीला उत्तर पाठवले. वादी क्र. १ हा दाव्यातील शेतजमिनीचा मालक व ताबेदार असून सदर जमिनीची हिस्से वाटणी झालेली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३ हे प्रतिवादी क्र. ५ हिने घेतलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी वादींच्या शांततामय कब्जास अडथळा करू शकत नाही. त्यामुळे त्यांचे कृत्य हे बेकायदेशीर असून त्यांना तात्पुरत्या मनाई हुकूमाद्वारे प्रतिबंध करणे आवश्यक असून अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

४. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तुत अर्जास शह देण्यासाठी लेखी म्हणणे सादर केले जे नि. क्र. १५ वर आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी अर्जातील कथन नाकारून असे कथन केले आहे की, मृतक ओमप्रकाश यांची पत्नी प्रतिवादी क्र. ५ हिने सन २००९ मध्ये म्हैस पालन व गाय पालन व्यवसायाकरिता वीस हजार रूपयाचे कर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या बचत

गटाकडून घेतले होते. त्यापैकी दहा हजार रूपये परत केले व उर्वरीत रक्कम दिली नसल्याने प्रतिवादींनी वकिलामार्फत तिला दिनांक १५/०३/२०१८ रोजी नोटीस पाठवून पैश्याची मागणी केली. नोटीस मिळाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना प्रतिवादी क. ५ हिने अड्याळ येथे बोलावून तिच्या हिस्स्यात, कब्जात व वहिवाटीत असलेली दाव्यातील शेतजमीन सहा फसलीकरिता प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दिली. त्यामुळे जुन २०१८ मध्ये प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दाव्यातील शेतजमिनीवर धानाचे परे लावले. त्यानंतर दिनांक १३/०६/२०१८ रोजी वादी क्र. १ याने प्रतिवादींना अडथळा करू नये म्हणून नोटीस पाठवले. त्यानंतर दिनांक १९/०६/२०१८ रोजी साक्षीदारांसमक्ष प्रतिवादी क्र. ५ हिने प्रतिवादी क्र. २ हिला करारपत्र दाव्यातील शेतजमिनीसंबंधाने लिहून दिल्यानंतर दिनांक २८/०६/२०१८ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दाव्यातील शेतजमिनीवर धानाची पेरणी केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ हे दावा दाखल करण्यापूर्वीपासून दाव्यातील शेतजमिनीच्या कब्जा व वहिवाटीत असून दाव्यातील शेतजमिनीची दिनांक १५/०३/२०१६ रोजी साक्षीदारांसमक्ष वादी क्र. १ व मयत ओमप्रकाश यांच्यात हिस्से बटवाडे झालेले आहेत व तसा बटवाडापत्र लिहून ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे वादींचा दावा प्रथमदर्शनी सिद्ध होण्यालायक नसून न्यायाचा संतुलनाचा तोल सुद्धा वादींचे बाजुने नाही, त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

५. प्रतिवादी क्र. ५ हिने प्रस्तुत अर्जास शह देण्यासाठी लेखी म्हणणे सादर केले जे नि. क्र. ३४ वर आहे. प्रतिवादी क्र. ५ हिने अर्जातील कथन नाकारून असे कथन केले आहे की, दाव्यातील शेतजमिनीवर वादीचा कधीही

कब्जा नव्हता. वस्तुतः दाव्यातील शेतजमिनीवर प्रतिवादी क्र. ५ मयत पती ओमप्रकाश यांच्या कब्जात होती व त्यांच्या मृत्यूनंतर प्रतिवादी क्र. ५ च्या कब्जात आली. प्रतिवादी क्र. ५ हिने सन २००९ मध्ये म्हैस पालन व गाय पालन व्यवसायाकरिता वीस हजार रूपयाचे कर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या बचत गटाकडून घेतले होते. त्यापैकी दहा हजार रूपये परत केले व उर्वरीत रक्कम दिली नसल्याने प्रतिवादींनी वकिलामार्फत तिला दिनांक १५/०३/२०१८ रोजी नोटीस पाठवून पैश्याची मागणी केली. नोटीस मिळाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना प्रतिवादी क. ५ हिने अड्याळ येथे बोलावून तिच्या हिस्स्यात, कब्जात व वहिवाटीत असलेली दाव्यातील शेतजमीन सहा फसलीकरिता प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दिली. त्यामुळे जुन २०१८ मध्ये प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दाव्यातील शेतजमिनीवर धानाचे परे लावले. त्यानंतर दिनांक १३/०६/२०१८ रोजी वादी क्र. १ याने प्रतिवादींना अडथळा करू नये म्हणून नोटीस पाठवले. त्यानंतर दिनांक १९/०६/२०१८ रोजी साक्षीदारांसमक्ष प्रतिवादी क्र. ५ हिने प्रतिवादी क्र. २ हिला करारपत्र दाव्यातील शेतजमिनीसंबंधाने लिहून दिल्यानंतर दिनांक २८/०६/२०१८ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दाव्यातील शेतजमिनीवर धानाची पेरणी केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ हे दावा दाखल करण्यापूर्वीपासून दाव्यातील शेतजमिनीच्या कब्जा व वहिवाटीत असून दाव्यातील शेतजमिनीची दिनांक १५/०३/२०१६ रोजी साक्षीदारांसमक्ष वादी क्र. १ व मयत ओमप्रकाश यांच्यात हिस्से बटवाडे झालेले आहेत व तसा बटवाडापत्र लिहून ठेवण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. ५ ही दाव्यातील जमिनीची कायदेशीर हिस्सेदार, वारसदार तसेच दाव्यातील शेतजमिनीच्या कब्जात व वहिवाटी आहे. त्यामुळे तिच्याविरूद्ध कायमची ताकीद किंवा तात्पुरता मनाई हुकूम मागण्याचा वादींना अधिकार नाही.

सबब तिने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

६. प्रतिवादी क्र. ४ याला समन्स तामील होवूनही तो प्रकरणात हजर झालेला नाही, त्यामुळे त्याचेविरूद्ध अर्जाची सुनावणी एकतर्फी करण्यात आली.

७. अर्ज वाचले. उभयपक्षाचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकून व अभिलेखावरील या टप्प्यावर सादर केलेल्या पुराव्याचे मुल्यांकनाअंती मी खालील मुद्यांवर कारणांसह माझे निष्कर्ष येणेप्रमाणे नोंदवत आहे :

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादींनी त्यांचा अर्ज प्रथमदर्शनी असल्याचे सिद्ध केले काय ? | होकारार्थी |
| २ | अनुकुलतेचा कल वादींच्या पक्षात आहे काय? | होकारार्थी |
| ३ | अर्ज नामंजूर केल्यास वादींची अपरिमित हानी होणार आहे काय ? | होकारार्थी |
| ४ | आदेश | अंतिम आदेशाप्रमाणे |

## —: कारणे मीमांसा :—

८. **मुद्दा क्र. १ बाबत** : वादींनी अर्जाच्या सिद्धतेसाठी नि. क्र. ४ सोबत दाव्यातील शेतजमिनीचा सात बारा उतारा, दिनांक १४/०६/२०१८ रोजीची रिपोर्ट, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या नोटीसाला दिलेले उत्तर दाखल केलेले असून नि. क्र. २५ सोबत अशोक गडु मेश्राम यांचे शपथपत्र व दिनांक १३/०७/२०१८ रोजीची प्रतिवादींची दिलेली रिपोर्टची प्रत दाखल केली आहे. याशिवाय नि. क्र. ३३ सोबत सेशन क्र. १५/२०१७ च्या रोजनाम्याची प्रत दाखल

केलेली आहे. याउलट, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी नि. क्र. ३६ सोबत दाव्यातील शेतजमिनीचा सात बारा उतारा, नमुना आठ 'अ', बटवाडापत्र, बॅक ऑफ इंडिया यांचे प्रतिवादी क्र. ५ ला कर्ज वसुलीकरिता दिलेला नोटीस, दिनांक १९/०६/२०१८ रोजीचा प्रतिवादी क्र. ५ हिने करून दिलेला करारनामा व वादींना पाठवलेल्या नोटीसीची प्रत इत्यादी दस्तऐवज दाखल केले आहे.

९. वादीच्या कथनाप्रमाणे दाव्यातील शेतजमिनीचे ते मालक असून वादी क्र. १ चा त्या जमिनीवर ताबा व वहिवाट आहे. प्रतिवादी हे त्यांचे शांततामय ताबा वहिवाटीस अडथळा करीत आहे. याउलट, प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे दाव्यातील शेतजमीन सहा फसलीकरिता प्रतिवादी क्र. ५ हिने तिच्यावरील असलेले कर्ज फेड करण्याकरिता प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दिलेली आहे. दाव्यातील शेतजमिनीचा सात बारा व नमुना आठ चे अवलोकन केले असता त्यावर प्रतिवादी क्र. ५ चे मयत पती ओमप्रकाश व वादी क्र. २ हिच्या नावाची नोंद दिसते. दाव्यातील शेतजमिनीमध्ये मयत ओमप्रकाश यांचा हिस्सा असून मृत्यूनंतर त्यांची पत्नी म्हणून प्रतिवादी क्र. ५ हिचा दाव्यातील शेतजमिनीमध्ये हिस्सा आहे. वादींनी दाव्यातील शेतजमिनीचे हिस्से बटवाडे झाले नसल्याचे कथन केले आहे. याउलट, प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे वादी क्र. १ व मयत ओमप्रकाश यांच्यामध्ये त्यांचे वडील जिवंत असताना दिनांक १५/०३/२०१० रोजी साक्षीदारांसमक्ष हिस्से बटवाडे करून हिस्से बटवाडा पत्र तयार करण्यात आले. प्रतिवादींनी नि. क्र. ३६ सोबत बटवाडा पत्र दाखल केलेले असून त्यामध्ये घर व जमिनीचे बटवाडे वादी क्र. १ व मयत ओमप्रकाश यांच्यामध्ये करण्यात आल्याचे दिसते. परंतु नि. क्र. ३६ सोबत दिलेल्या बटवाड्यापत्रामध्ये

नेमक्या कोणत्या घराचे व कोणत्या शेतजमिनीचे बटवाडे करण्यात आले, याचा बोध होत नाही. कारण की, सदर बटवाड्यापत्रामध्ये कोणत्या घराची, त्यांचा घर क्रमांक किती, कोणता घर कोणाली देण्यात आला, तसेच कोणती शेतजमिनीचे बटवाडे करण्यात आला, त्याचा गट क्रमांक किती व कोणत्या चतु:सीमेची जमीन कुणाला देण्यात आली, याबाबत काहीही नमूद नाही. त्यामुळे नेमकी दाव्यातील शेतजमीन मयत ओमप्रकाश यांच्या हिस्स्यात देण्यात आली किंवा दाव्यातील शेतजमिनीपैकी वादी क्र. १ व मयत ओमप्रकाश यांच्यामध्ये दाव्यातील शेतजमिनीचे अर्धेअर्धे हिस्से करण्यात आले, असे म्हणता येणार नाही. महत्वाची बाब म्हणजे, सदरचा दस्त हा पंजीबद्ध करण्यात आलेला नाही. याशिवाय दाव्यातील शेतजमिनीचा सात बारा उतारावर मयत ओमप्रकाश व वादी क्र. २ यांचे नाव दिसून येत आहे. वादी क्र. २ ही वादी क्र. १ यांची पत्नी आहे. याशिवाय सदर बटवाडा पत्राच्या आधारे दाव्यातील शेतजमिनीवर फेरफार झाल्याबाबत काहीही दिसून येत नाही. त्यामुळे दाव्यातील शेतजमिनीची वादी क्र. १ व मयत ओमप्रकाश यांच्यामध्ये बटवाडे झाले होते, या प्रतिवादींच्या कथनामध्ये तथ्य दिसून येत नाही. याउलट, दाव्यातील शेतजमिनीचे बटवाडे झाले नाही, या वादींच्या कथनामध्ये तथ्य दिसून येत आहे.

१०. वादी क्र. १ याने दाव्यातील शेतजमीन त्यांच्या ताब्यात व वहिवाटीत असल्याचे कथन केले आहे. याउलट, प्रतिवादी क्र. ५ हिने ओमप्रकाश जिवंत असताना त्याचा दाव्यातील शेतजमिनीवर ताबा व वहिवाट असल्याचे व त्यांचे मृत्यूनंतर दाव्यातील शेतजमीन तिच्या ताब्यात असल्याचे कथन केले आहे. ओमप्रकाश हा दिनांक २६/०९/२०१६ रोजी मयत झालेला असून त्याचे

मृत्यूसंबंधी प्रतिवादी क. ५ हिला आरोपी करण्यात येवून सत्र न्यायालय येथे प्रकरण क्र. ५५/२०१७ चालू असल्याचे वादीने नि. क्र. ३३ सोबत दाखल केलेल्या दस्तावरून दिसून येते. वादींनी प्रतिवादी क्र. ५ ही दिनांक २६/०९/२०१६ पासून आपल्या माहेरी मौजा अड्याळ, ता. पवनी, जि. भंडारा येथे राहत असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र. ५ हिने नि. क्र. ३४ वर लेखी उत्तर दाखल केलेले असून त्यातसुद्धा तिचा हल्लीचा पत्ता मौजा अड्याळ येथे दाखवलेला आहे. त्याचप्रमाणे नि. क्र. २१ वर रजिस्टर पत्ता दाखल केलेला असून प्रतिवादी क्र. ५ हिचा हल्ली मु. अड्याळ येथे दाखवलेला आहे. त्यामुळे अड्याळ येथून येवून प्रतिवादी क्र. ५ ही दाव्यातील शेतजमीन कसत असेल, या कथनामध्ये तथ्य दिसून येत नाही. वादींनी नि. क्र. २५ वर अशोक गळु मेश्राम याचे शपथपत्र दाखल केलेले असून त्याने त्यांचे शपथपत्रात वादी क्र. १ हा दाव्यातील शेतजमिनीच्या ताब्यात व वहिवाटीत असल्याचे कथन केले आहे. यावरून वादी क्र. १ हा दाव्यातील शेतजमिनीचा ताबा व वहिवाटीत असल्याचे स्पष्ट होत आहे.

११. प्रतिवादींनी दाव्यातील शेतजमीन प्रतिवादी क्र. ५ वर असलेले कर्जाच्या वसुलीकरिता करारपत्र करून सहा फसलीसाठी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दिली असल्याचे कथन केले आहे. वादींचे विद्वान विधिज्ञ श्री हिरकने यांनी कर्ज हे सन २००९ साली घेतलेले असून कर्ज मुदतबाहय असल्याने वसूल करता येणार नाही, असे कथन केले. कर्ज मुदतबाहय आहे किंवा काय, याबाबत सखोल चौकशीची आवश्यकता असून या टप्प्यावर त्याबाबत चर्चा करण्याची आवश्यकता नाही. प्रतिवादींनी नि. क. २६ सोबत दस्त क्र. २ वर बॅंक ऑफ इंडिया यांनी

प्रतिवादी क्र. ५ हिला कर्ज वसुलीकरिता पाठवलेल्या नोटीसाची प्रत दाखल केलेली आहे. दस्त क्र. ८ वर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादी क्र. १ याला पाठवलेल्या नोटीसाची प्रत दाखल केली असून सदर नोटीसीचे अवलोकन केले असता दिनांक २२/०५/२००९ रोजी प्रतिवादी क्र. ५ हिने त्यांच्या बचत गटाकडून वीस हजाराचे कर्ज घेवून करारनामा साक्षीदारांसमक्ष लिहून दिल्याचे व त्या काराररनाम्यानुसार एक वर्षाच्या आत रक्कम परत न केल्यास घरातील तेवढयाच किंमतीची वस्तू किंवा शेती जप्त करण्याचा अधिकार त्यांना राहिल अशी अट नमूद करण्यात आल्याचे दिसून येते; परंतु प्रतिवादींनी दिनांक २२/०५/२००९ रोजीचा करारनामा प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला नाही. याशिवाय प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदर नोटीसामध्ये मयत ओमप्रकाश लांजेवार यांच्या हिस्स्यातील शेतीमध्ये फसल घेण्याकरिता प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना कोणत्याही प्रकारे अडथळा करू नये, असे वादी क्र. १ ला सूचित करण्यात आल्याचे दिसते. प्रतिवादी क्र. ५ हिने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या बचत गटातून कर्ज घेतले व ते कर्ज प्रलंबित आहे, असे मान्य केले तरी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना प्रतिवादी क्र. ५ वर कर्ज वसुलीकरिता कारवाई करणे आवश्यक होते. परंतु यासंबंधी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रतिवादी क्र. ५ हिला कोणत्याही प्रकारची नोटीस पाठवली नसल्याचे दिसते. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचे लेखी बयानात दिनांक १५/०३/२०१८ रोजी प्रतिवादी क्र. ५ ला नोटीस पाठवून थकीत कर्जाच्या परतफेडीची मागणी केल्याचे कथन केले आहे. परंतु प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदर नोटीसाची प्रत अभिलेखावर दाखल केली नाही. त्याचप्रमाणे मी याआधीच चर्चा केल्याप्रमाणे दिनांक २२/०५/२००९ रोजीचा करारनामा सुद्धा प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दाखल केलेला नाही.

१२. नि. क्र. ३६ वर दस्त क्र. ५ वर शेतजमिनीचा करारनामा प्रतिवादींनी दाखल केलेला असून सदरचा करारनामा दिनांक १९/०६/२०१८ रोजी करण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र. ५ हिचे पती मयत ओमप्रकाश यांच्या दाव्यातील शेतजमिनीपैकी हिस्स्यातील शेतजमीन जय मा अम्बे महिला बचत गट यांना कर्ज वसुलीकरिता सहा फसलीकरिता देण्यात आल्याचे नमूद आहे. सदर करारनाम्यामध्ये सुद्धा तिच्या पतीचा मृत्यू झाल्यामुळे ती आपल्या माहेरी राहत असल्याचे नमूद आहे. दाव्यातील शेतजमीन एकत्रित आहे किंवा त्या जमिनीचे वादी क्र. १ व मयत ओमप्रकाश यांच्यामध्ये हिस्से बटवाडे झालेले आहेत, याबाबत सखोल चौकशीची आवश्यकता असून या टप्प्यावर दाव्यातील शेतजमिनीचे हिस्से बटवाडे झाले नसून ती एकत्रित असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ५ ही मयत ओमप्रकाश यांची पत्नी म्हणून वारस असल्याने तिला जरी हिस्स्याचा अधिकार असला तरी दाव्यातील शेतजमिनीचे हिस्से बटवाडे होण्यापूर्वी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना सदर जमीन सहा फसलीकरिता देण्याचा व त्यासंबंधी करारनामा करण्याचा प्रतिवादी क्र. ५ हिला अधिकार पोहचत नाही. वरील एकंदरीत चर्चेवरून वादी हे दाव्यातील शेतजमिनीच्या ताब्यात व वहिवाटीत असल्याचे दिसून येत आहे. याशिवाय वादींनी नि. क्र. ४ सोबत दिनांक १४/०६/२०१८ रोजीची जय अम्बे महिला बचत गट यांच्याविरूद्ध दिलेल्या रिपोर्टची प्रत दाखल केली असून नि. क्र. २५ सोबत दिनांक १३/०७/२०१८ रोजीची प्रतिवादी क्र. १ ते ३ विरूद्ध दिलेल्या रिपोर्टची प्रत दाखल केली आहे. याशिवाय नि. क्र. २६ वर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादींना पाठवलेल्या नोटीसाची प्रत असून यावरून प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे वादींच्या शांततामय

ताब्यास अडथळा निर्माण झाल्याचे स्पष्ट होत आहे. एकंदरीत वादींनी त्यांची केस सकृतदर्शनी असल्याचे दिसून येते. तसेच न्यायाचे संतुलनाचा तोलसुद्धा वादींच्या बाजुने दिसून येत आहे. त्यामुळे तातपुरता मनाई हुकूमाचा आदेश नामंजूर केल्यास वादींची अपरिमित असे कधीही भरून न निघणारे नुकसान होण्याची संभवना आहे. याउलट, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना प्रतिवादी क्र. ५ कडून कर्जाची रक्कम वसूल करण्याकरिता कायदेशीर मार्ग आहे, त्यामुळे त्यांचे कोणतेही नुकसान संभवत नाही. सबब मी मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ४ चा निष्कर्ष नोंदविण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

**—:: आ दे श ::—**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३, त्यांचे नातेवाईक, त्यांचे प्रतिनिधी व त्यांचे मार्फत इतर यांस मौजा घाटी/पळसगांव, ता. अर्जुनी/मोरगांव येथील गट क्र. १३८/१ आराजी ०.६१ हे. आर. या जमिनीवरील वादींच्या शांततामय ताब्यास अडथळा करण्यापासून दाव्याच्या निकाल लागेपर्यंत प्रतिबंधीत करण्यात येते.

३. अर्जाचा खर्च मुळ दाव्यासोबत.

स्वा/—

दिनांक : २०/१२/२०१८

( स्व. ली. रामटेके )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
अर्जनी/मोरगाव.